# महाराष्ट्रप्रदूषणनियंत्रणमंडळ

☎ :24010437/24020781/4014701
फॅक्स:24024068
visitusat:http//mpcb.gov.in
email:enquiry@mpcb.gov.in

कल्पतरुपॉईंट, 2/ 3/ 4 थामाळा,
सिनेटप्लॅनेटसमोर, सायनसर्कल,
सायन (पूर्व), मुंबई - 400 022.

क्रमांक : मप्रनि/सहा.स(तां)/ २५९

दिनांक : ९.०६.२०१६.

## प रि प त्र क

**विषय:- जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्ष लागवड अभियान राबविण्याबाबत..**

५ जून हा दिवस संपूर्ण विश्वात जागतिक पर्यावरण दिन म्हणुन साजरा केला जातो. गेल्या तीन दशकाच्या वाटचालीत बदलते हवामान, तापमानातील वाढ आणि एकूणच ग्लोबल वॉर्मिंगचा होणारा विपरित परिणाम याने साऱ्या विश्वाला चिंताग्रस्त केले आहे. पर्यावरण आणि प्रदूषण नियंत्रणाकरीता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कायद्याच्या अंमलबजावणीबरोबरच व्यापक जनजागृती केली जात आहे. प्रदुषण नियंत्रणाकरीता वृक्षांचे महत्व अनन्यसाधारण आहे. म.प्र.नि.मंडळातर्फे दरवर्षी वृक्ष लागवड करण्याकरिता व त्याचे संगोपन करण्यासाठी सर्व उद्योगांना कळविण्यात येते व त्यांच्यामार्फत वृक्ष लागवडींचा कार्यक्रम करण्यात येतो. यावर्षीही मा.सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांनी दिनांक १२/०५/२०१६ रोजीच्या पत्रान्वये सर्व प्रादेशिक अधिकारी तसेच उद्योजकांना वृक्ष लागवडीची विशेष मोहिम राबविण्यासाठी कळविले आहे. राज्य शासनाने यावर्षी एकूण दोन करोड वृक्षलागवडीचा संकल्प केलेला आहे व या उपक्रमात पर्यावरण विभाग व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचा व्यापक सहभाग आहे. यामध्ये म.प्र.नि.मंडळ यांनी ५० लाख वृक्ष लागवडीची उद्दीष्ट ठेवलेले असून ते उद्योजकांकडून, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था, महानगरपालिका, नगरपरिषद, स्थानिक नागरिक तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रे यांचा सहभाग करण्याचे ठरविले आहे. सदरहू उपक्रम पर्यावरण विभाग, म.प्र.नि.मंडळ, वन विभाग व महसूल विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येणार आहे.

यावर्षी १० जून, २०१६ ते ०१ जुलै, २०१६ पर्यंत वृक्ष लागवडीची सुरुवात प्रथम ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हयामध्ये करण्याचे ठरले आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयामध्ये कमीत-कमी दीड लाख वृक्ष लागवड व संगोपन करण्याचे प्रस्तावित आहे. मंडळाच्या सदर उपक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी खालील नियोजन करण्यात येणार आहे.

१. याबाबत राज्यातील म.प्र.नि.मंडळाच्या प्रादेशिक कार्यालयाने संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली वृक्ष लागवड व संगोपन समिती त्वरित गठीत करावी. त्यामध्ये उप-प्रादेशिक अधिकारी, जिल्हा वन अधिकारी, जिल्हा अधिकारी यांचे प्रतिनिधी तसेच स्थानिक स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी व स्थानिक नागरिक यांचा समावेश करण्यात यावा. संबधित प्रादेशिक अधिकारी हे विभागीय स्तरावर तर उप प्रादेशिक अधिकरी हे जिल्हास्तरावर सर्व संबंधित विभागांशी समन्वय साधुन नियोजन करतील.

..२..

२. प्रत्येक जिल्हयात कमीत-कमी दीड लाख वृक्ष लागवड व संगोपनासंबंधी कार्यक्रम आखणे. वृक्ष लागवड करतांना वड, पिंपळ, गुलमोहोर, बावा, कदंब अशा उपयोजित झाडांना अग्रक्रमाने प्राधान्य देण्यात यावे. फळ झाडे उपलब्धतेनुसार जास्तीत जास्त प्रमाणात लावण्याचा प्रयत्न अपेक्षित आहे. याकरीता उपलब्ध होणारे रोप किमान १८ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीचे असणे आवश्यक आहे.

३. वृक्षलागवडीकरिता मोकळया जागा उपलब्ध करुन देण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था, उदा. ग्रामपंचायत/ नगरपरिषद/ नगरपालिका अथवा वनविभाग यांच्याशी म.औ.वि.महामंडळाशी संबंधित गठित समितीने संपर्क साधून मोकळया जागांची निश्चिती जुलै, २०१६ पर्यंत करणे आवश्यक आहे.

४. वृक्ष लागवड करण्यात येणारी ठिकाणे निश्चित झाल्यानंतर वृक्ष लागवड व संगोपन यांची जबाबदारी संबंधित समितीने औद्योगिक आस्थापना, स्थानिक स्वयंसेवी संस्था अथवा समितीस योग्य वाटेल अशा संस्थेस संबंधित वृक्ष संगोपनाचे पालकत्व देण्यात यावे व त्यासाठी येणारा खर्च संबंधित औद्योगिक आस्थापनांच्या सामाजिक बांधिलकी उपक्रमातुन (सी.एस.आर. फंड) मा.जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात यावा.

५. वृक्ष लागवड झाल्यानंतर त्याच्या संगोपनाच्या मासिक माहितीचा तक्ता तयार करुन त्याची पडताळणी, रोपाच्या वाढीची माहिती याचे संकलन करुन सदरहू माहिती संबंधित समितीने संबंधित जिल्हाधिकारी यांच्यामार्फत संपूर्ण माहिती मा.अध्यक्ष, म.प्र.नि.मंडळ तथा प्रधान सचिव, पर्यावरण यांच्याकडे त्रैमासिक तत्वावर सादर करावी.

६. वरील बाबींविषयी संबंधित जिल्हाधिकारी यांनी तात्काळ नियोजन करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत. वन विभागाच्या रोपवाटीका व आवश्यकतेनुसार फळझाडांची रोपे खाजगी रोपवाटीका किंवा कृषी विभागाच्या रोपवाटीकांमधुन घेण्यात यावीत. जिल्हयातील प्रत्येक उद्योगांना वृक्ष लागवड व संगोपनासाठी लागणारा खर्च (CSRFund) या निधीतून करण्याबाबत निर्देश देण्यात येत आहेत.

सदर परिपत्रक मा.प्रधान सचिव यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

(डॉ.भ.ना.पाटील)
सदस्य सचिव

**प्रत माहितीसाठी रवाना,**

१. **खाजगी सचिव,** मा.मंत्री, पर्यावरण, मंत्रालय, मुंबई.

२. **खाजगी सचिव,** मा.राज्यमंत्री, पर्यावरण, मंत्रालय, मुंबई.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

१. **मा.प्रधान सचिव,** पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

२. **मा.प्रधान सचिव,** महसूल व वने विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

आपणांस विनंती करण्यात येते की, आपल्या स्तरावर वृक्षलागवडीसंबंधीचे परिपत्रक पारित करण्यात यावे.

३ **मा.जिल्हाधिकारी,** ------------------------------------------------------------------

**प्रति,**

१. **सह संचालक (हप्रनि)/ सहायक सचिव(तां)/सह-संचालक (जप्रनि)/प्रधान वैज्ञानिक अधिकारी/ प्रादेशिक अधिकारी-मुख्यालय,** म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय.

२. **मुख्य लेखा अधिकारी/ विधी अधिकारी/ वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी/ लेखा अधिकारी (आस्थापना)/ कार्यकारी अभियंता,** म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय.

**प्रत माहितीसाठी:-**

१. **प्रादेशिकअधिकारी,**मुख्यालय/ मुंबई/ ठाणे/ कल्याण/ रायगड/ नवी मुंबई/ पूणे/ नाशिक/ नागपूर/ औरंगाबाद/ कोल्हापूर/ अमरावती/ चंद्रपूर.

२. **उप-प्रादेशिक अधिकारी,** मुंबई-१/ मुंबई-२/ मुंबई-३/ मुंबई-४/ ठाणे-१/ ठाणे-२/ तारापूर-१/ तारापूर- २/ नवी मुंबई-१/ नवी मुंबई-२/ तळोजा/ कल्याण-१/ कल्याण-२/ कल्याण-३/ भिवंडी/ रायगड-१/ रायगड-२/ रायगड/ महाड/ कोल्हापूर/ सांगली/ रत्नागिरी/ चिपळूण/ पूणे-१/ पूणे-२/ पिंपरी- चिंचवड/ सातारा/ सोलापूर/ औरंगाबाद/ जालना/ नांदेड/ नाशिक/ अहमदनगर/ जळगाव/ धुळे/ नागपूर-१/ नागपूर-२/ चंद्रपूर/ अमरावती-१/ अमरावती-२/ अकोला/ परभणी/ लातुर/ भंडारा.